ISSN 2249-894X VOL. 4 | ISSUE. 6 | MARCH 2015

REVIEW OF RESEARCH

# दलित कविता : स्वरूप आणि भवितव्य






**जया जितेंद्र कदम**

मराठी विभाग प्रमुख, मु. सा. काकडे महाविद्यालय,
सोमेश्वरनगर, बारामती, पुणे.

*सारांश*ः

दलित साहित्य म्हटल्यावर चटकन् आपल्या डोळ्यापुढे येणारे साहित्य म्हणजे 'दलित कविता' हेच होय. बहुतांष दलित साहित्यिकांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी काव्याचेच माध्यम स्वीकारलेले असल्यामुळे संख्यात्मक दृष्या दलित साहित्यामध्ये 'दलित कविता' हाच वाङ्मयकार उठून दिसणारा आहे. पण संख्यात्मक वैपुल्य हेच काही दलित कवितेचे ठळक वैषिष्ट्ये नाही. दलित साहित्याची प्रेरणा, त्याचे तात्त्विक अधिष्ठान, त्याच्या दलित साहित्यिकांना अभिप्रेत असणाऱ्या आणि इतरांनाही जाणवणाऱ्या वेगळेपणाची समर्थ वैषिष्ट्ये दलित कवितेमध्ये आढळतात.

## दलित कविता : स्वरूप आणि भवितव्य

### प्रस्तावना

विददलित कवितेचे स्वरूप पाहण्यापूर्वी तिच्या निर्मितीप्रक्रियेचा विचार करणे योग्य होईल. कारण या निर्मितीप्रक्रियेनेच तिची स्वरूपनिष्चिती केलेली आहे. सामान्यतः इतर साहित्यकृतीप्रमाणेच कविताही जीवनानुभवातून निर्माण होते; हे ढोबळ विधान दलित कवितेच्या बाबतीत करताना आणखी काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात; त्या म्हणजे, जीवनानुभव आणि दलित कविता यांच्या अगोदरही पाहाणाऱ्या पूर्वनिष्चित, विचारप्रधान दृष्टकोनाचा. हा दृष्टीकोन म्हणजेच वेदना, विद्रोह, नकार तसेच अज्ञान, भूक, अस्पृष्यता, दारिद्र्य, वेठबिगारी, अगतिकता आणि हीच दलित कवितेची आषयसूत्रे आहेत. ही आषयसूत्रे असली तरी, दलित कविता आत्मषोधातूनच अधिक प्रकट झाली आहे. हा आत्मषोध आत्मसन्मानाच्या, अस्तित्त्वाच्या जाणिवेतून प्रकट झाला आहे. आत्मसन्मानाच्या आड येणाऱ्या परंपरेला, धर्माला नकार दिला जातो. जिथे धर्म अगर परंपरांची सक्ती असेल तिथे बंडखोरी किंवा विद्रोह दिसून येतो. 'माणूस' हा दलित कवितेने केंद्रस्थानी मानला आहे. 'माणूस' म्हणून जगता यावे, त्याच्या महानतेच्या, विकासाच्या, कतृत्त्वाच्या सर्व दिषा मोकळ्याा व्हाव्यात हाच प्रयत्न दलित साहित्यिकांचा आहे. दलितांचे संपूर्ण साहित्य माणसाच्या मोठेपणाषी निगडीत आहे. 'माणूस' हा देष, धर्म आणि परमेष्वरापेक्षाही मोठा असल्याचे वर्णन अनेक दलित कवींनी केले आहे. याठिकाणी मी प्रातिनिधिक स्वरुपात बाबुराव बागुल यांची 'वेदाआधी तू होतास' या कवितेचा उल्लेख करू इच्छिते.

'वेदा आधी तू होतास
वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास
पंच महाभूतांचे पाहून
विराट, विक्राळ रूप
तू व्यथित, व्याकूळ होत होतास
आणि हात उभारून तू याचना करीत होतास'

परंतु परिवर्तनासाठी प्रत्येक वेळेस संयमी भाषा वापरून चालत नाही. आपले दुःख, वेदना या उद्रेकाच्या, नकारच्या स्वरूपात बाहेर येतातच. म्हणूनच आपल्या दलित बांधवांवर होणाऱ्या वर्षानुवर्षाच्या अन्यायाविरूद्ध कवींचा विद्रोही स्वर उमटताना दिसतो. दलितांनी भोगलेली दुःखे परमेष्वरही भोगू षकणार नाही. असे केषव मेश्राम सारख्या कवीला वाटते. त्यामुळेच परमेष्वराला षिव्या देण्याचे धाडस ते करतात.

"साल्या! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडषील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसषील काय?
भावाबहिणींची हाडके झिजवषील
त्याच्या दारूच्या घोटासाठी भडवेगिरी करषील?" (उत्खनन : पृ. 74)

आत्मसन्मानासाठी केलेला हा विद्रोह, उद्रेक डोळस आहे आणि वास्तवही आहे.

नामदेव ढसाळांसारखा कवी आपल्या बांधवांवर स्वातंत्र्यानंतरही होणारा अन्याय, अत्याचार, पाहून संतप्त होतो आणि त्यांचा संताप जळजळीत शब्दांद्वारे बाहेर पडतो."स्वातंत्र्य हे कुठल्या गाढवीचं नाव आहे?" समाजविरोधी विचार शब्दांद्वारे बाहेर मांडण्याचे धाडस दलितांवर होणाऱ्या अन्यायामुळे असे होऊ शकले.

षिक्षण घेतल्यामुळे दया पवारांसारख्या कवीला दलित बांधवांचे दुःख सहन होत नाही. त्यांच्या मनाचा कोंडमारा होतो. डोक्यात अनेक प्रष्न थैमान घालतात. त्यामुळे

"कषाला झाली पुस्तकांची ओळख
बरा ओहळाचा गोठा
गावची गुरं वळली असती
असल्या इंगळ्याा डसल्या नसत्या!"( कोंडवाडा : पृ. 20)

असा षिकल्याचं विषाद त्यांना वाटु लागतो. परंतु षिक्षणाने विचारांना षब्दातुन वाट करून देण्याचे धाडसही येते. वाल्मिकीसारख्या कवीला समाजाने महाकवी ठरविले. ज्या क्रौंच पक्ष्याच्या हत्येने वाल्मिकीचे मन आक्रंदून जाते. परंतु दलितांची दुःखे दिसत नाहीत. अषा विषमतेमुळे कवी त्या महाकवीलाच उद्देषून म्हणतो—

"हे महाकवे,
तुला महाकवी तरी कसे म्हणावे
हा अन्याय, अत्याचार वेषीव टांगणारा
एक जरी ष्लोक तू रचला असतास....
...... तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते."( कोंडवाडा : पृ.15)

गावकुसाबाहेर जगणाऱ्या दलित समाजाची कुणी दखल घेतली नाही की कुणी त्यांच्या दुःखावर उपाय सुचविला नाही. त्यांना कायम पषुपातळीवरचे जीवन जगावे लागले. त्यामुळे वामन निंबाळकर दलितेतर समाजाला उद्देषून म्हणतात की,

"ह्या गावकुसाबाहेरचे वाळलेले, चिरडलेले जीवन
विषय झाला नाही तुमच्या कवितेचा
त्यांच्या रक्ताळलेल्या पावलांना, जळणाऱ्या अब्रूला
स्पर्षला नाही तुमचा कविताशब्द

शब्द पेरलेच नाहीत तुम्ही
या माणसांच्या माणुसकीसाठी
यांच्या रिकाम्या पोटासाठी,"( गावकुसाबाहेरील कविता : पृ. 2)

दलित कवींनी पारंपरिक दुःखाची झळ स्वतःच भोगलेली असल्याने त्यांचे षब्द, त्यातला उग्र आवेष, तळमळ काळजाला भिडते. घोटभर पाण्यासाठी दलितांना आपले रक्त आटवावे लागते. त्यामुळे आपली ही व्यथा सांगताना कवी प्रल्हाद चेंदवणकर म्हणतात—

"घोटभर पाण्यासाठी
हंडाभर रक्ताचं
दान मागणारा
हा देष
कसा म्हणू मी माझा
जरी तो देत असला
जगाला
षांतीचा (कोरडा)
उपदेष" ( ऑडीट : पृ. 32)

एकंदरीत, ज्या परंपरागत व्यवस्थेने माणसाला 'माणूस' म्हणून नाकारते. अषा चातुर्वर्ण्यव्यवस्थेविरूद्ध, जातिप्रथेविरूद्ध दलित कवितेतून संघर्ष आला आहेच. परंतु स्त्रीला 'माणूस' म्हणून विकासाच्या संधी नाकारणाऱ्या पुरूषप्रधान व्यवस्थेविरूद्ध प्रखर संघर्ष काही कवयत्रिंच्या काव्यातून प्रकट होताना दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित स्त्रीमध्ये आत्मविष्वास जागवला. युगानुयुगाच्या लाचारीवर प्रहार करून, परिवर्तनाचे बळ घेऊन ती क्रांतीसन्मुख झालेली दिसते. त्यामुळेच वर्णव्यवस्थेबरोबरच पुरूषप्रधान व्यवस्थेविरूद्ध संघर्षही त्यांनी महत्त्वपूर्ण मानला आहे.

हिरा बनसोडे हिने स्त्रियांवरच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दलित स्त्री व तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराचा घंटानाद मांडून पुरूषप्रधान संस्कृतीच्या व्यासपीठावर स्त्रीवर्गाची फिर्याद आणली. तिला न्याय देणे म्हणजे तिची न्यायाची भूकच आहे. त्यामुळे ती न्यायाची भूक मागते. तिची फिर्याद अषी आहे की –

"लोक हो! तुमच्या न्यायालयात
मी फिर्याद आणली आहे
तुम्ही तरी मला न्याय द्याल का?
स्वतःच्या घरात निर्वासित असलेली मी
उपेक्षेची जन्मठेप भोगतेय जन्मोजन्मी."( फिर्याद)

म्हणून मला तुम्ही न्याय द्यायला हवा. पुरूषप्रधान संस्कृतीच्या अनेक नात्याने अन्याय होतो. तिला न्याय पाहिजे म्हणून तिला फिर्याद मांडावी लागते.

प्रज्ञा लोखंडे यांच्या 'अंतःस्थ', 'उत्कट जीवघेण्या धगीवर' ह्या कविता संग्रहांनी नावलौकिक मिळवून दिला. दलित स्त्रीचा उंचवलेला स्वर त्यांच्या कवितेतून प्रकट होतो. बदलत्या वास्तवाचे चित्रण त्यांची कविता करते. स्त्रीस्वातंत्र्याला बांध घालणाऱ्या षक्तींविरूद्ध ती आवाज उठवते.

"एकविसाव्या शतकाच्या सांस्कृतिक चिखलात
आता वाढत चाललाय दिशाहीन कोलाहल
चहूबाजूंनी चिणला जातोय तुझा बुलंद आवेग
तरीही तू निमूटपणे चालतेस
त्यांनी आखून दिलेल्या रस्त्यावरून
तरीही तू बोलत नाहीस
दबलेल्या हुंकाराबद्दल"

आषालता कांबळे यांच्या 'अवसेचा काळोख' या कवितेतील नायिका म्हणते,

'तुझं माझ्या आयुष्यात येणं,
म्हणजे अवसेचा काळोखाला
षुभ्र चांदण्यानि उजळवणं'

याबरोबरच ज्योती लांजेवर, मल्लिका अमर षेख, मीना गजभिये, सुरेखा भगत, उषा अंभोरे अषा अनेक कवयित्रींनी जातिव्यवस्थेबरोबरच त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण केले आहे. त्यांच्या कवितांमधून 'स्त्रीमुक्ती' साठी अर्थात मानवमुक्तीसाठी 'समता' संघर्ष आलेला आहे.

आजच्या स्त्रीचं पुरूषी कर्तृत्व आणि तिच्या नकळत लादलं गेलेलं वर्चस्वाचं दास्यत्व, याचा जाब तिने कुणाला विचारावा? कोण तिची सुटका करणार यातून? खरे तर तिने स्वतःच यातून मार्ग काढायला हवा. समाजव्यवस्था बदलण्याच्या प्रयत्नात कधी विद्रोही तर कधी समंजस बनायला हवे. बहिणाबाई चौधरींच्या कवितेतील 'सुगरणीचा खोपा' स्त्रीलाही हवाच की. पण त्यासाठी तिला किती किंमत मोजायला लावावी याचा विचार फक्त पुरूषानेच करून चालणार नाही, तर पुरूषप्रधान मानसिकता असलेल्या स्त्रीनेही करायला पहिजे.

अषा सहजीवनाचे कौतुक करत असतानाच तिच्या विकासाच्या दिषांना कुंपणे घातली जातात आणि परत एकदा आयुष्य अंधारमय झाल्यासारखे वाटते. वरीलप्रमाणे प्रातिनिधिक स्वरूपात काही कवींच्या कवितांमधून दलित कवितेचे स्वरूप पाहिले.

दलित कवितेच्या आषयाचे हे स्वरूप पाहिल्यानंतर असे दिसते की, दलित कवितेमागील प्रेरणा वेगळ्या आहेत. तसेच परंपरेने चालत आलेल्या मराठी कवितेपेक्षा आषयदृष्ट्या ती वेगळी आहे. तिला तिचा स्वतःचा असा चेहरा मोहरा आहे. तिने मराठी कवितेचे अनुभवविष्व अधिकाधिक व्यापक केले. उच्चवर्गियांच्या भावभावनांचा आविष्कार करणाऱ्या कविताप्रवाहास समाजाच्या तळापर्यंत नेऊन पोहचवले. षेकडो वर्ष मूक राहिलेल्या अंतःकरणाचे कढ दलित कवितेद्वारे प्रकट होऊ लागल्याने जाणिवांचा एक समर्थ प्रवाह मराठी कवितेत अवतरला. या अस्सल शक्तिशाली, जिवंत जाणिवांच्या प्रवाहाने मराठी कविता अधिकच तेजस्वी बनली. दलित कवितेला नामदेव ढसाळ, केषव मेश्राम, दया पवार, नारायण सुर्वे, षरणकुमार लिंबाळे, त्र्यंबक सपकाळे, प्रल्हाद चेंदवणकर, वामन निंबाळकर, ज. वि, पवार, यषवंत मनोहर, चोखा कांबळे, नीलकांत चव्हाण, अरूण कांबळे, भुजंग मेश्राम, लेकनाथ यषवंत, अरूण काळे, प्रज्ञा लोखंडे, ज्योती लांजेवार, आषालता कांबळे, हिरा बनसोडे, माधव कोंडविलकर, सिध्दार्थ तांबे, धनंजय वाघमारे असे कितीतरी कवी दलित कवितेला समृद्ध करीत आहेत. यांच्या कवितेतून जसे माणुसकीचे हक्क नाकारलेल्या समाजाचे दर्षन घडते तसे मराठी साहित्यातील साचलेपणाची कळा नष्ट करू पाहणाऱ्या, सवर्ण हिंदूच्या संवेदनशीलतेवर दलित कविता बौध्दिक आणि भावनिक घणाघात घालीत आहे. विद्रोहाची आग फुलविणारी चीड, संताप व्यक्त करणारी कविता छंदबध्द, नादमधुर, अलंकारप्रिय असणारच नाही. तिने रूढार्थाने कवितेच्या व्याकरणाची मोडतोड करून टाकली आहे आणि असे घडणेही अटळ आहे.

दलित कवितेच्या आषयाचे स्वरूप पाहिल्यानंतर दलित कवितेच्या भवितव्याविषयी विचार करणे आवष्यक वाटते. एकूणच दलित कवितेचा सुरूवातीपासूनचा तर आजपर्यंतचा विकास पाहताना असे दिसते की, दलित कवितेची घोडदौड आज काही प्रमाणात मंदावली आहे. याचे कदाचित दलित कवितांवर घेतले गेलेले आक्षेप असू शकेल. उदा.

दलित कविता (एकूणच दलित साहित्य) हे प्रचारी आहे
एकसुरी आहे
आक्रस्ताळेपणा आहे.
समूहनिष्ठ असल्याने व्यक्ती येत नाही
नकारात्मक भूमिका आहे.

पण या वरील आक्षेपांना समर्पक उत्तरे अनेक दलित साहित्यिकांनी दिलेली आहेत आणि ती वास्तवही आहेत. वरील आक्षेप हे एक कारण असले तरी, आज दलित कवितेच्या भवितव्याचा विचार करताना तिने काळानुसार बदलणे आवष्यक आहे. नामदेव ढसाळांच्या काळी असलेला विद्रोह आणि आजचा विद्रोह यात फरक पडल्याचे दिसते. त्यामुळे आषयात बदल होणे आवष्यक आहे. नाहीतर एकसूरी राहण्याचा धोका संभवू शकतो. दलित कविता मंदावण्याचे आणखी एक कारण पुनरावृत्ती. पुनरावृत्ती दोषामुळे म्हणावी तषी दाद मिळत नाही. परिणामी नवोदित कवींची परखड समीक्षा झाली की ते लिहायचेच थांबतात. वास्तविक पाहता एकाच विषयावर अनेकांनी लिहिणे हा काही दोष मानता येणार नाही. संतसाहित्याचा केंद्रबिंदू 'परमेष्वर' होता. तरीही संत कवींनी बहुआयामी काव्याची निर्मिती केलेली दिसते. ही गोष्ट दलित कवींनी लक्षात घ्यायला हवी.

दलित कवितेच्या भवितव्याच्या संदर्भात विचार करताना आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे उचित वाटते. ते म्हणजे, दलित कवितेतून जाणवणारा 'समता' संघर्ष केवळ जातिव्यवस्थेतून निर्माण झालेल्या अन्यायाबद्दल येतो. परंतु पुरुषप्रधान व्यवस्थेतून जाणवणारा 'समता' संघर्ष प्रत्ययाला येत नाही. स्त्रीच्या अंतर्बाहय ताणंचे दर्षन घडविण्यात कमी पडते. तसेच याव्यतिरिक्त आणखीही काही कारणे दिसतात, ती म्हणजे– अभ्यासू वृत्तीचा अभाव, नव्या प्रतिमा–प्रतीके षोधण्याची कुवत हरवून बसल्यासारखी काहींची कविता जाणवते, माहितीचा अभाव नवोदित कवींमध्ये जाणवतो. परंपरावाद्यांचे अनुकरण करण्यात धन्यता मानण्यातच रमल्याने समकालीन प्रष्नांपासून दलित कविता दूरावते. तसेच सभोवताली घडणाऱ्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक स्थित्यंतराची माहिती नसते. परंतु या स्थित्यंतरातून काही नवोदित कवी मार्ग काढताना दिसतात. प्रतिनिधिक उदाहरण म्हणून सिध्दार्थ तांबे यांच्या 'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून' या संग्रहाचा उल्लेख करता येईल. 'आयडियल स्टेट' ही मूळ प्लेटोची संकल्पना आहे. कवींनी विवेक, षौर्य, संयम आणि न्याय या सद्गुणांचा परिपोषण करणारे लेखन केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. जे असे लेखन करणार नाहीत त्यांना आदर्ष राज्यात स्थान असणार नाही. याउलट स्थिती आपल्याकडे आहे. हे सद्गुण ज्यांच्याकडे होते त्यांना 'मनू'प्रणीत व्यवस्थेने बहिष्कृत केले, षूद्र ठरवले. या वर्गाचा प्रतिनिधी असल्याची जाणीव सिध्दार्थ तांबे यांचा 'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून' या संग्रहातून होते. मनूप्रणीत आदर्ष राज्यात नौतिकतेला वाव नाही म्हणूनच धर्मव्यवस्थेने लादलेल्या संकल्पना आणि विचारव्यूहावर प्रहार, त्यातील मिथकांना उद्ध्वस्त करण्याचे काम या संग्रहातील अनेक कवितांनी केलेले दिसते.

एकंदरीत दलित कविता ही विसाव्या षतकातील एक ऐतिहासिक सांस्कृतिक आणि वाङ्मयीन वस्तुस्थिती आहे. प्रस्थापित साहित्य प्रवाहाला जोरदार धक्का देणाऱ्या या कवितेने पारंपरिक मराठी कवितेचे संकेत झुगारून दिले आणि आपल्या वेदना व कोंडमाऱ्याचे वास्तवदर्षी चित्रण केले. अर्थात यात काही मर्यादा असल्यातरी मराठी साहित्याचे, भाषेचे आकाष समृध्द करणारा काव्यप्रवाह म्हणून त्याचे भवितव्य अबाधित राहणारच. त्यामुळेच दलित साहित्याच्या भविष्याच्या संदर्भात आपले मत व्यक्त करताना अर्जुन डांगळे म्हणतात की, ''दलित साहित्य हे काही कल्पनारम्य आणि मनोरंजनप्रधान साहित्य नाही. सामाजिक वास्तवाषी त्याचे अतूट असे नाते आहे. जोर्यंत ह्या दाहक सामाजिक वास्तवाच्या रुपात काही बदल होत नाही, तोपर्यंत दलित साहित्याची निर्मिती ही अटळ व अपरिहार्य आहे. दलित साहित्य म्हणून जे लिहिले जाईल ते सर्व श्रेष्ठ साहित्य असे मी मानत नाही आणि कुणी तसे मानूही नये. परंतु एक मात्र निष्चित की मराठीला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून देण्याची मोठी जबाबदारी ही निखालस दलित साहित्यावर आणि दलित साहित्यिकांवर येऊन पडलेली आहे.''

### *संदर्भग्रंथ सूची*

1.दलित विद्रोह, अर्जुन डांगळे, ग्रंथघर प्रकाषन प्रथम आवृत्ती– 27 सप्टेंबर 1991

2.दलित साहित्य समीक्षा, डॉ. ज्योती लांजेवार, सुगावा प्रकाषन प्रथम आवृत्ती– 14 एप्रिल 1992
3.तिच्या जगण्याच्या वेणा, संपा. डॉ. भारती निरगुडकर, डॉ. मंगला सिन्नरकर, डॉ. वसंत षेकडे, डॉ. धनाजी गुरव, स्नेहवर्धन, प्रकाषन प्रथम आवृत्ती– 26 जानेवारी 2008